# जागतिक लोकसंख्या दिवस



लोकांमध्ये कुटुंबनियोजनाबाबत जागृती करणे हे जागतिक लोकसंख्यादिवसाचे उदिद्ष्ट आहे. गर्भनिरोधके जागतिक लोकसंख्या वाढीवर नियंत्रण करण्यात महत्वाचे कार्य करतात. कुटुंब नियोजन/ गर्भनिरोधकाचा वापर यामुळे असुरक्षित गर्भपात कमी **होतो**. नको असलेली गर्भधारणा टाळता येते. कुटुंब नियोजन/गर्भनिरोधके यामुळे माता-बाल मृत्युचे प्रमाण कमी होते. फार्मासिस्टला सर्व गर्भनिरोधक पर्यायांची माहिती असणे आवश्यक आहे.

## नसबंदी



- ✓ अंडनलिका कापणे किंवा गाठ मारण्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागते.
- ✓ त्यामुळे अंड व शुक्राणू यांचा मिलाप होत नाही
- ✓ 99.8% परिणामकारक (अत्यंत परिणामकारक)

## गर्भनलिकेत ठेवण्याची साधने



- T आकाराची तांब्याची तार ठेवली जाते (Copper T )
- त्यामुळे मुख्यतः फलधारणा रोखली जाते.
- 5 वर्षापर्यंत ठेवता येते.
- 99.5% परिणामकारक

## कंडोम



- ❖ कंडोम हे एक पातळ लवचिक आवरण असते.
- ❖ पुनर्वापर करता येत नाही, पुरुष जननेंद्रियावर घटट् बसते.
- ❖ या पिशवीत वीर्य जमा होते आणि शुक्राणु स्त्री जननेंद्रियात सोडले जात नाही.
- ❖ 82% ते 98% परिणामकारक

## इंजेंक्शनद्वारा उपाय योजना



- ✓ संप्रेरक (प्रोजेस्टीन) चे इंजेक्शन हात किंवा नितंबावर देणे, तीन महिने परिणाम राहतो.
- ✓ अंड गर्भाशयात येणे थांबते आणि गर्भाशयमुखावरील आवरण जाड होते, ज्यामुळे शुक्राणू गर्भाशयात जाऊ शकत नाही.
- ✓ 94% ते 99.8% परिणामकारक

## गर्भनिरोधक गोळया



- एकत्रित स्वरुपात इस्ट्रोजेन **व** प्रोजेस्टीन ही संप्रेरके असतात.
- अंड गर्भाशयात सोडले जात नाही.
- 94% ते 99.8% परिणामकारक

## गर्भधारणेबाबत जागृती




- ❖ गर्भधारणा कधी होऊ शकते याविषयी जाणून घेणे.
- ❖ महिलांनी त्यांच्या मासिक पाळीवर लक्ष ठेवावे.
- ❖ मासिक पाळीतील अनियमितपणामुळे चुक होऊ शकते.
- ❖ 76% ते 97% परिणामकारक परंतू चूक होण्याची शक्यता अधिक

## काढून घेणे

- ➢ पुरुष वीर्यपतनापूर्वी स्त्री जननेंद्रियातून जननेद्रिय काढून घेण्याची कृती करतो.
- ➢ वीर्यपतनापूर्वीच्या द्रावात काही शुक्राणू असू शकतात.
- ➢ अविश्वसनीय पध्दत

**जन्मनियंत्रण हे जगासाठी वरदान ठरेल**

जनहितार्थ जारी

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे औषध माहिती केंद्र